# प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.३०.११.२०२१

**आरोपी क्रं.१ अनिल तुकाराम पाटील, वय–४६, व्यवसाय–मजुरी खाजगी इसम, रा.कासार गल्ली,नगरदेवळा,ता. पाचोरा,जि.जळगांव आरोपी क्रं.२ विजय रुपचंद लढे, वय–६७, व्यवसाय– व्यापार खाजगी इसम, रा.मारवाडी गल्ली, नगरदेवळा, ता.पाचोरा जि.जळगांव यांना १०,०००/–रु.लाचेची मागणी करुन १०,०००/–रुपये लाचेची रक्कम स्वीकारंताना लाचलुचपत प्रतिबंध विभाग,जळगांव यांची कारवाई.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव |
| २ | **गुन्हा नोंद क्रमांक** | :– | चोपडा शहर पो.स्टे., गु.र.नं.४००/२०२१ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ अ प्रमाणे... |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | १) अनिल तुकाराम पाटील, वय–४६, व्यवसाय–मजुरी खाजगी इसम, रा.कासार गल्ली,नगरदेवळा,ता.पाचोरा,जि.जळगांव.<br>२) विजय रुपचंद लढे, वय–६७, व्यवसाय– व्यापार खाजगी इसम, रा.मारवाडी गल्ली, नगरदेवळा, ता.पाचोरा जि.जळगांव<br>**(दोन्ही खाजगी इसम)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.३०/११/२०२१<br>१०,०००/–रु. लाचेची मागणी |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | १०,०००/–रु. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.३०/११/२०२१ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील मुळ तक्रारदार हे दिव्यांग असुन त्यांनी सुमारे ०२ महिन्यापुर्वी दिव्यांगत्वाचा दाखला मिळणेसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय,जळगांव येथे अर्ज दिला होता. त्यानंतर तक्रारदार यांना आरोपी क्रं.१ हे भेटले व त्यांनी माझी जिल्हा सामान्य रुग्णालय,जळगांव येथे डॉक्टरांशी ओळख असुन मी त्यांचेकडुन तुला ४०% चे वरील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र तयार करुन आणुन देतो असे सांगुन १०,०००/–रु.लाचेची मागणी केली बाबत तक्रारदार यांनी दि.२९.११.२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव यांचेकडेस तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने दि. ३०/११/२०२१ रोजी पंच साक्षीदारा समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी क्रं.१ यांनी तक्रारदार यांचकडेस जिल्हा सामान्य रुग्णालय,जळगांव येथील डॉक्टरांकडुन ४०% चे वरील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र तयार करुन आणुन देण्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन तसेच आपल्या वैयक्तीक प्रभावाचा वापर करुन तक्रारदार यांचेकडेस १०,०००/–रुपये लाच मागणी केली व सदर लाचेची रक्कम स्वत:आरोपी क्र.१ यांनी स्विकारुन सदर लाचेची रक्कम आरोपी क्रं.२ यांचेकडेस दिली म्हणुन गुन्हा. |

लचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:**– अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.
**ईमेल आयडी:**– dyspacbjalgaon@gmail.com
**संकेतस्थळ:**– acbmaharastra.gov.in
**टोल फ्री क्रमांक:**– १०६४
**दुरध्वनी क्रमांक:**– ०२५७–२२३५४७७
**व्हॉटसॲप क्रमांक:**– ८७६६४१२५२९

पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

30.11.2021

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**